


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे •अंक २४४ • शुक्रवार दि.२६ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## राम मंदिर देणगी घोटाळा प्रकरणी ८ जणांवर गुन्हा दाखल




नवी दिल्ली: अयोध्येतील श्रीराम मंदिराला मिळालेल्या देणग्यांतील कथित गैरव्यवहार प्रकरणाने नवे वळण घेतले असून, राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे महासचिव चंपत राय आणि अध्यक्ष अनिल मिश्रा यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे. विश्व हिंदू परिषदेच्या निर्देशानंतर दोघांनीही महंत नृत्य गोपाल दास यांच्याकडे राजीनामे सादर केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या एसआयटीच्या तपासाला गती आली आहे. आतापर्यंत ८ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर चौघांना पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. या घडामोडीमुळे राजकीय आणि सामाजिक पातळीवरील चर्चा अधिक तीव्र झाली आहे.

### अध्यक्ष,महासचिवांचा राजीनामा ;एसआयटी तपासाला वेग

अयोध्येतील राम मंदिरात गेल्या काही दिवसांपासून देणग्या आणि प्रसाद व्यवस्थापनातील कथित अनियमिततेबाबत आरोप होत होते. या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेश सरकारने विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करून चौकशी सुरू केली. आतापर्यंत या प्रकरणात आठ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून काहींना अटकही करण्यात आली आहे. एसआयटीच्या प्राथमिक अहवालानंतर तपासाला गती मिळाली असून, त्यातील शिफारशींवर आधारित पहिला एफआयआर नोंदविण्यात आला आहे. एफआयआरमध्ये चंपत राय किंवा अनिल मिश्रा यांची नावे नसली, तरी नैतिक जबाबदारी स्वीकारत त्यांनी पदाचा राजीनामा दिल्याचे सांगितले जात आहे. विरोधी पक्षांकडून सातत्याने त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत होती. दरम्यान, समाजवादी पक्ष आणि आम आदमी पक्षाने राम मंदिरातील देणगी स्वरूपात प्राप्त झालेल्या रोकड, सोन्या-चांदीचे दागिने व अन्य मौल्यवान वस्तूंच्या व्यवस्थापनावर गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. एसआयटीच्या प्राथमिक तपासात सुमारे ३,५०० कोटी रुपयांच्या मुद्देमालाच्या नोंदीत विसंगती असल्याचा दावा समोर आला आहे. मात्र, या टप्प्यावर कोणालाही थेट जबाबदार ठरविण्यात आलेले नाही. तपासादरम्यान १५० हून अधिक व्यक्तींची चौकशी, सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी आणि मंदिरातील विद्यमान व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला आहे. अंतिम अहवालानंतर संबंधित व्यक्तींची जबाबदारी निश्चित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे या बहुचर्चित प्रकरणाकडे देशभराचे लक्ष लागले आहे.

## ऑपरेशन सिंदूरच्या ६ शूरवीरांची नावे युद्ध स्मारकावर

### तब्बल तेरा महिन्यांनी शहीदांची नावे सरकारकडून जाहीर

नवी दिल्ली:देशाच्या सुरक्षेसाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या ऑपरेशन सिंदूरमधील भारतीय सशस्त्र दलाच्या सहा शहीद जवानांची नावे तब्बल तेरा महिन्यानंतर अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहेत. या वीर जवानांचा समावेश राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या अधिकृत संकेतस्थळावरील रोल ऑफ ऑनर मध्ये करण्यात आला असून, नवी दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या २०२५ विभागातील ३-डी स्मृतीभिंतीवरही त्यांची नावे कोरण्यात आली आहेत. त्यामुळे ऑपरेशन सिंदूरमधील शौर्य आणि बलिदानाला राष्ट्राकडून अधिकृत सन्मान मिळाला आहे.

अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेल्या शहीदांमध्ये लान्स नाईक दिनेश कुमार (५ फील्ड रेजिमेंट, शहादत-७ मे), एव्हिएटर मुद मुरली नायक (८५१ लाईट रेजिमेंट, शहादत-९ मे), सार्जंट सुरेंद्र कुमार (वायुसेना पदक-VM, ३९ विंग, भारतीय हवाई दल, शहादत-१० मे), सुभेदार मेजर पवन कुमार (मुख्यालय, १० इन्फंट्री ब्रिगेड, शहादत-१० मे), रायफलमन सुनील कुमार (वीर चक्र-VrC, ४ जम्मू आणि काश्मीर लाईट इन्फंट्री, शहादत-१० मे) आणि हवालदार सुनील कुमार सिंग (२३७ फील्ड वर्कशॉप कंपनी, शहादत-६ जून) यांचा समावेश आहे. ६ मे २०२५ रोजी भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूरअंतर्गत पाकिस्तान आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर लक्षित कारवाई केली होती. या मोहिमेत जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबाच्या नऊ दहशतवादी तळांवर अचूक हल्ले करण्यात आले होते.त्यानंतर १० मे रोजी भारत आणि पाकिस्तानच्या लष्करी कारवायांचे महासंचालक यांच्यात झालेल्या चर्चेनंतर दोन्ही देशांनी लष्करी कारवाया थांबवण्यावर सहमती दर्शवली होती. इंडिया गेट परिसरात २०१९ मध्ये उभारण्यात आलेले राष्ट्रीय युद्ध स्मारक हे स्वातंत्र्यानंतर देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सैनिकांच्या स्मृतीचे प्रतीक मानले जाते.

## गोकुंदा रेल्वे गेटवर चेन ओढून रेल्वे थांबवण्याचा गंभीर प्रकार



किनवट/प्रतिनिधी- आदिलाबाद ते नांदेड धावणाऱ्या इंटरसिटी एक्सप्रेसला सायंकाळच्या सुमारास गोकुंदा येथील रेल्वे गेटवर साखळी (चेन) ओढून थांबवण्याचे प्रकार अत्यंत गंभीर रूपाचे असून इतर प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत आहेत. गेट बंद झाल्यानंतर अर्धा अर्धा तास गेट उघडेपर्यंत प्रवाशांसह महामार्गावरील वाहनांचा मोठा खोळंबा (वाहतूक कोंडी) होतोय. रेल्वे प्रशासनाने या समाजविघातक घटकांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

धावती रेल्वे स्थानकावर पोहोचण्यापूर्वी हुल्लडबाज प्रवासी गोकुंदा रेल्वे गेट बंद करीत आहेत. हा राष्ट्रीय महामार्ग असल्याने अत्यंत वर्दळीचे ठिकाण असून, रेल्वे अचानक थांबल्याने गेट बराच वेळ बंद राहते. यामुळे अनेकदा गंभीर रुग्णांना घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिका (म्बुलन्स) या वाहतूक कोंडीत अडकून पडत आहेत. वेळेवर वैद्यकीय उपचार न मिळाल्यास अशा रुग्णांच्या जीविताला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी किंवा गंमत म्हणून ट्रेन थांबवणाऱ्यांमुळे एखाद्या निष्पाप व्यक्तीचा जीव जाऊ शकतो, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत. सायंकाळची वेळ ही नोकरदार, व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांच्या घरगुती परतीची असते. याच मुख्य वेळी इंटरसिटी एक्सप्रेसची चेन ओढून गाडी उभी केली जात असल्याने गेटच्या दोन्ही बाजूंना शेकडो वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. रेल्वेचे नियम धाब्यावर बसवून चालणाऱ्या या प्रकारामुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. गोकुंदा गेटवर हा प्रकार घडत असून रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) च्या ढिलाईमुळे हे समाजकंटक मोकाट फिरत असल्याचा आरोप प्रवाशांनी केला आहे. या ठिकाणी तात्काळ रेल्वे पोलिसांची गस्त वाढवावी आणि चेन ओढणाऱ्यांना जागेवरच पकडून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे.




नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त पीपल्स महाविद्यालयात निर्माण करण्यात आलेल्या सेल्फी पॉईंटचे उद्घाटन करतांना माजी अध्यक्ष, माजी खा.व्यंकटेश काब्दे, अध्यक्ष सीए डॉ.प्रविण पाटील, उपाध्यक्ष प्रफुल्ल अग्रवाल, सचिव श्यामल पत्की, सहसचिव प्रदीप नागापूरकर, कार्यकारिणी सदस्य स.नौनिहालसिंघ जहागीरदार, डॉ.उमेश भालेराव, चिरंजीलाल दागडीया, नगरसेविका शांभवी साले, प्राचार्य विकास सुकाळे, उपप्राचार्य डॉ.विशाल पतंगे यांच्यासह इतर मान्यंवर दिसत आहेत.

!! करणसिंह बैस !!
प्रेस फोटोग्राफर




आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोक चव्हाण, महापौर सौ.कविता मुळे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी स्थायी समितीचे सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, सभागृह नेते ॲड.महेश कनकदंडे, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, किशोर स्वामी व इतर उपस्थित होते.

## भाजप आमदार-खासदारात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी

### मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमात बसण्यावरुन वाद


पुणे:सारथी संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या मराठा समाजातील यूपीएससी व एमपीएससी परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या पालकांच्या सत्कार सोहळ्यात पहिल्या रांगेतील आसनव्यवस्थेवरून भाजपचे आमदार अभिमन्यू पवार आणि राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांच्यात वाद निर्माण झाला. या घटनेनंतर नाराज झालेल्या मेधा कुलकर्णी यांनी कार्यक्रमस्थळ सोडल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडत होता.





कार्यक्रमादरम्यान पहिल्या रांगेत बसण्याच्या मुद्द्यावरून वादाची ठिणगी पडली. मेधा कुलकर्णी यांनी आरोप केला की, अभिमन्यू पवार यांनी हा मराठा समाजाचा कार्यक्रम असल्याने तुम्ही पुढे बसू नका, अन्यथा वाद होईल, असे सांगितले. या वक्तव्यामुळे आपण दुखावल्याचे सांगत त्यांनी कार्यक्रमातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.घटनेनंतर अभिमन्यू पवार यांनी सर्व आरोप फेटाळून लावत गैरसमज झाल्याचे स्पष्ट केले. मी फक्त अण्णासाहेब विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांना पुढे बसू द्यावे, एवढेच सांगितले होते. आपण दोघे मागे बसू, असेही मी ताईंना म्हटले होते. माझ्या वक्तव्यात जातीचा कोणताही संदर्भ नव्हता. माझ्या बोलण्यामुळे कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असे पवार म्हणाले. दुसरीकडे, मेधा कुलकर्णी यांनी पवार यांच्या स्पष्टीकरणावर असमाधान व्यक्त केले. नरेंद्र पाटील पुढे बसावेत, याबाबत माझी कोणतीही हरकत नव्हती. मात्र मला जातीच्या आधारावर पुढे बसू नका, असे सांगण्यात आले. त्यामुळे माझा अपमान झाल्याची भावना निर्माण झाली, असे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मानासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमातच निर्माण झालेल्या या वादामुळे भाजपमधील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चर्चेत आले असून, या घटनेचे राजकीय पडसाद उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# राजकारणातील ‘मस्ती’ आणि कायद्याचे ‘मौन’

**महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला वैचारिक मतभेदांची आणि सुसंस्कृत संवादाची एक मोठी परंपरा लाभली आहे. मात्र, अलीकडच्या काळात सत्तेच्या समीकरणांमुळे आणि राजकीय पक्षांतरामुळे या संस्कृतीला गालबोट लागताना दिसत आहे. मूळचे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे खासदार असलेले आणि नुकतेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत दाखल झालेले खा. संजय ‘गुंडा’ पाटील यांनी गेल्या काही दिवसांत पत्रकारांशी आणि विरोधकांशी बोलताना वापरलेली भाषा पाहता, ‘बंडखोर’ नेत्यांमध्ये आलेली ही ‘मस्ती’ नेमकी कोणाच्या बळावर आहे?, असा गंभीर प्रश्न महाराष्ट्राच्या सुजाण जनतेला पडला आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या गेलेल्या पत्रकारितेवर आणि जाहीरपणे विरोधकांवर गोळ्या-बॉम्बची भाषा करणाऱ्या या नेत्याच्या वर्तणुकीमुळे महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेचे तीन-तेरा वाजल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.**

**‘वाय प्लस’सुरक्षा की,दडपशाहीचा परवाना?**

**काही दिवसांपूर्वी जेव्हा ठाकरे गटाच्या खासदारांच्या गळतीची चर्चा सुरू होती, तेव्हा संजय ‘गुंडा’ पाटील स्वतः उद्धव ठाकरेंच्या संपर्कात होते आणि संसदीय पक्षाच्या बैठकीला हजर राहण्याचे आश्वासन देत होते. मात्र, दुसऱ्याच दिवशी त्यांनी घुमजाव केले आणि सत्ताधारी पक्षात प्रवेश केला. पक्ष बदल करणे ही आजच्या राजकारणात नवीन गोष्ट राहिलेली नाही; पण या पक्ष बदलानंतर ज्या वेगाने त्यांना राज्य शासनाकडून ‘वाय प्लस’ दर्जाची सुरक्षा व्यवस्था पुरवण्यात आली, तिथूनच खऱ्या अर्थाने या संजय ‘गुंडा’ पाटील यांची भाषा बदलली.**

**सुरक्षा मिळेपर्यंत अत्यंत नरमाईने बोलणारे हे खासदार सुरक्षा कवच मिळताच थेट गुंडगिरीच्या भाषेत बोलू लागले आहेत. ‘‘माझ्या नादी लागू नका, माझ्या नादी लागलेले एक तर दवाखान्यात गेले नाही तर स्मशानात गेले. मी पाच-पाच खून पचवलेले आहेत, माझं कोणी काही वाकडं करू शकत नाही. माझ्या विरोधात येणाऱ्यांच्या अंगावर बॉम्ब टाकेल,गोळ्या घालून मारील,’’ अशी जाहीर विधाने त्यांनी केली. एका लोकप्रतिनिधीच्या तोंडून येणारी ही भाषा लोकशाहीला कालिमा फासणारी आहे. ही सुरक्षा त्यांना जनतेच्या पैशातून दिली गेली आहे की विरोधकांना आणि पत्रकारांना धमकावण्यासाठी दिली आहे, याचा जाब गृहखात्याने विचारण्याची गरज आहे.**

**गृहखात्याची हतबलता आणि उपमुख्यमंत्र्यांची सावरासावर**

**या चिथावणीखोर वक्तव्यानंतर शिवसेना (ठाकरे गट) खा.संजय राऊत यांनी या प्रकरणाचा खरपूस समाचार घेतला आणि मुंबई पोलीस आयुक्तांची भेट घेऊन थेट तक्रार दाखल केली. ‘‘संजय ‘गुंडा’ पाटील यांच्याकडे बॉम्ब कुठून आले? त्यांनी कोणत्या कारणासाठी पाच लोकांचे खून केले? याची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी,’’ अशी रास्त मागणी राऊतांनी केली. या गंभीर प्रश्नावर जेव्हा पत्रकारांनी संजय ‘गुंडा’ पाटील यांना बोलते करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा स्वतःचे पाप झाकण्यासाठी ते थेट पत्रकारांवरच घसरले. पत्रकारांना अत्यंत हीन पातळीवर जाऊन धमकावणे हा थेट लोकशाहीच्या स्वातंत्र्यावर हल्ला आहे.**

**सर्वात दुर्दैवी बाब म्हणजे, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ज्यांच्याकडे राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेची थेट जबाबदारी आहे, त्यांनी आपल्या खासदाराचे हे कृत्य अत्यंत गांभीर्याने घेणे अपेक्षित होते. परंतु, आपल्या पक्षातील खासदाराची बाजू सावरण्यासाठी त्यांनी या संपूर्ण प्रकरणाला बगल देण्याचा प्रयत्न केला. ‘‘संजय राऊत काय बोलतात’’ याकडे जनतेचे लक्ष वेधून उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या खासदाराच्या गुंड प्रवृत्तीवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला. सत्ताधाऱ्यांची ही भूमिका ‘गुन्हेगारीचे उदात्तीकरण’ करणारी असून, यामुळेच अशा नेत्यांचे मनोबल अधिक उंचावते आहे.**

**कायदा सर्वांसाठी समान कधी होणार?, सुरक्षा आणि खासदारकीही रद्द करा!**

**महाराष्ट्रात सर्वसामान्य नागरिकासाठी कायद्याचे नियम अत्यंत कडक आहेत. एखाद्या सर्वसामान्य नागरिकाकडे किंवा व्यापाऱ्याकडे बंदुकीचे परवानाधारक (लायसन्स) शस्त्र असेल आणि त्याने चुकूनही कोणाला धमकी दिली, तर पोलीस प्रशासन तात्काळ त्याचे लायसन्स रद्द करते आणि शस्त्र जप्त करून त्याला गजाआड करते. मग हाच न्याय ऑन स्क्रीन, कॅमेऱ्यासमोर पत्रकारांना आणि विरोधकांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणाऱ्या खासदाराला का लागू होत नाही? संजय ‘गुंडा’ पाटील कायद्यापेक्षा मोठे आहेत का? ‘‘कोणी आपले काही वाकडे करू शकत नाही,’’ हा त्यांचा अहंकार केवळ त्यांचा नसून त्यांना मिळालेल्या सत्तेच्या संरक्षणाचा आहे.**

**केवळ पत्रकारांची जाहीर माफी मागून हा विषय संपणारा नाही. लोकशाहीत कायद्याचे राज्य टिकवून ठेवावयाचे असेल, तर सरकारने कोणतीही राजकीय सहानुभूती न दाखवता संजय ‘गुंडा’ पाटील यांना दिलेली ‘वाय प्लस’ दर्जाची सुरक्षा केवळ काढून न घेता, त्यांची खासदारकीही तातडीने रद्द करण्यात यावी. लोकशाहीच्या पवित्र मंदिरात अशा गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीला लोकप्रतिनिधी म्हणून बसण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही. तसेच, त्यांनी स्वतःहून मान्य केलेल्या ‘पाच खुनांच्या’ विधानाची सखोल पोलीस चौकशी झाली पाहिजे.**

**सत्ता येते आणि जाते, पण सत्तेच्या बेधुंदपणात जो समाजमाध्यमांसमोर आणि जाहीरपणे कायद्याची पायमल्ली करतो, त्याला जनता कधीही माफ करत नाही. सध्याचे सरकार आपल्या राजकीय स्वार्थासाठी या संजय ‘गुंडा’ पाटील यांना क्लीन चीट देणार की; खरोखरच कायद्याचे राज्य असल्याचे सिद्ध करणार? जर सत्ताधाऱ्यांनी या प्रकरणाकडे कानाडोळा केला, तर महाराष्ट्रातील जनता येणाऱ्या काळात या मस्तीखोर राजकारण्यांना त्यांची जागा दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही, हे निश्चित.**

# वसतिगृहाच्या चळवळीतून सामाजिक सुधारणा करणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज



भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासात अनेक महापुरुषांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षण हेच मुक्तीचे शस्त्र मानले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मूलमंत्र दिला. जागतिक स्तरावरही अमेरिकेचे शिक्षणतज्ज्ञ जॉन ड्यूई, दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला आणि इतर अनेक विचारवंतांनी शिक्षणाला समाज परिवर्तनाचा पाया मानले. मात्र शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली करण्यासाठी केवळ शाळा उभारणे पुरेसे नसते; विद्यार्थ्यांना राहण्याची, जेवणाची, अभ्यासाची आणि सुरक्षित वातावरणाचीही गरज असते. ही गरज ओळखून वसतिगृहांच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची व्यापक चळवळ उभारणारे भारतातील अग्रगण्य समाजसुधारक म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज.

२६ जून १८७४ रोजी जन्मलेल्या यशवंतराव घाटगे यांना पुढे कोल्हापूरच्या राजघराण्यात दत्तक घेण्यात आले. पुढे ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणून इतिहासात अजरामर झाले. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांनी करवीर संस्थानची राज्यसूत्रे स्वीकारली. ६ मे १९२२ ला त्यांचे निधन झाले. अवघ्या ४८ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि प्रशासकीय क्षेत्रात इतके क्रांतिकारी कार्य केले की, त्यांना आधुनिक भारताच्या सामाजिक क्रांतीचे शिल्पकार म्हणून गौरविले जाते.बहुजन समाजाला अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी राजर्षी शाहूंनी अनेक चळवळी उभी केल्या त्यातील सर्वाधिक प्रभावी चळवळ ही वसतिगृहांची चळवळ ठरली आहे. राज्याच्या कोषातून, राजाच्या उपयोगाच्या, मंदिराच्या डागडुजीच्या पैशाला त्यांनी वसतीगृहासाठी वळते केले. काहींना वार्षिक मदत, काहींना इमारती, काहींना जमीनी देऊन स्वतः उभे राहून त्यांनी वसतिगृहे उभारली.शाहू महाराजांच्या विचारांवर महात्मा ज्योतिराव फुले, यांच्या सत्यशोधक चळवळीचा मोठा प्रभाव होता. बहुजन समाजाचे उत्थान शिक्षणातूनच होऊ शकते, हा फुले यांचा विचार शाहू महाराजांनी प्रत्यक्ष प्रशासनात उतरविला. एका शतकानंतरही आजही त्यांच्या वसतिगृहांमधून अनेकांचे आयुष्य घडत असून त्यांनी सुरू केलेली ही चळवळ जवळपास १२५ वर्षानंतरही अजूनही सक्षमपणे विद्यार्थी घडविण्याचे काम करीत आहे.कोल्हापुरात विविध ठिकाणी उभे असणारे हे वसतीगृह छत्रपती शाहू महाराजांच्या दूरदृष्टीची कल्पना देणारे ठरतात.

सुरुवातीला सर्व जाती-धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी एकत्रित वसतिगृहाचा प्रयोग करण्यात आला. राजाराम वसतिगृह हा त्याचा प्रारंभिक प्रयत्न मानला जातो. मात्र प्रत्यक्षात सामाजिक विषमता आणि जातीय पूर्वग्रहांमुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अपेक्षित वातावरण मिळत नव्हते. काही ठिकाणी प्रवेशाचे धोरण सर्वांसाठी खुले असले तरी प्रत्यक्ष लाभ काही मोजक्या घटकांनाच मिळत असल्याचे शाहू महाराजांच्या निदर्शनास आले. या अनुभवातून त्यांनी स्वतंत्र समाजनिहाय वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेतला. जातीव्यवस्थेचा पगडा समाजावरून जात नसल्यामुळे शाहू महाराजांनी काढलेला हा उपाय बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रभावी ठरला. या वसतिगृहांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी संबंधित समाजातील सुशिक्षित आणि विश्वासार्ह व्यक्तींवर सोपविण्यात आली. त्यामुळे समाजातील नेतृत्व विकसित झाले आणि शिक्षणाची चळवळ लोकचळवळ बनली. सामाजिक परंपरा, चातुर्वर्ण्याचा प्रभाव त्यामुळे पुढे त्यांनी बहुजन विद्यार्थ्यांना वेगळी वसतीगृहे काढून जातीच्या उतरंडीच्या जोखडातून मुक्त केले.कोल्हापूर संस्थांमध्ये १८९६-९७ ला दुष्काळ पडला.ग्रामीण भागातून मुले शिक्षणासाठी येणे बंद झाले. राहणे, खानावळ, कपडालत्ता सर्वच गरीबांना परवडणे शक्य नव्हते.ही बाब शाहू महाराजांच्या लक्षात आली याशिवाय लंडन दौऱ्यामध्ये तेथील शिक्षण पद्धतीचा अभ्यास केल्यावर त्यांना वसतिगृह ही कल्पना नावीन्यपूर्ण व परिवर्तनाची वाटली.१९०१ पासून कोल्हापूरमध्ये वसतिगृह उभारणीची व्यापक चळवळ सुरू झाली. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, जैन बोर्डिंग, मुस्लिम बोर्डिंग, वीरशैव लिंगायत बोर्डिंग, नामदेव बोर्डिंग, दैवज्ञ बोर्डिंग, सारस्वत बोर्डिंग, कोष्टी, आर्य समाज गुरुकुल, वैश्य बोर्डिंग, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग, ढोर- चांभार समाजासाठी इंदुमती राणीसाहेब वसतीगृह, अनुसुचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी अर्थात अस्पृशांसाठी मिस क्लार्क वसतिगृह उभारण्यात आली. संशोधनपर नोंदींनुसार शाहू महाराजांनी सुमारे २० ते २२ वसतिगृहांचे जाळे उभे केले होते.

शाहू महाराजांच्या वसतिगृह चळवळीतील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९०८ मध्ये सुरू झालेले मिस क्लार्क वसतिगृह. हे वसतिगृह अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आले होते. हजारो वर्षे ज्यांना शिक्षणापासून वंचित ठेवल्या गेले. त्या अस्पृश्य समाजाला शिक्षणाची दारे सताड उघडणारा हा क्रांतिकारी निर्णय होता. तत्कालिन व्यवस्थेत या निर्णयाची चर्चा देशभर झाली.शाहू महाराजांची ही दूरदृष्टी आणि या निर्णयाची गरज काय होती हे त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विदेशात शिक्षणासाठी १९२० मध्ये त्यांनी केलेल्या

**प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर

मदतीतून स्पष्ट होते. राजर्षी शाहू महाराजांची मागासवर्गीयांबाबतची कणव यातून स्पष्ट होते.१९०८ मध्ये स्थापन झालेले मिस क्लार्क वसतिगृह हे भारतातील दलित विद्यार्थ्यांसाठीच्या सर्वात महत्त्वाच्या शैक्षणिक उपक्रमांपैकी एक होते. गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांच्या कन्या मिस व्हायोलेट क्लार्क यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी देणगी व जनजागृतीचे कार्य केले. त्यांच्या योगदानाचा गौरव म्हणून शाहू महाराजांनी त्यांच्या नावाने वसतिगृह सुरू केले. हे वसतिगृह दलित शिक्षणाच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरले. शाहू महाराजांनी या वसतिगृहासाठी स्वतंत्र इमारत, खेळाचे मैदान आणि आर्थिक अनुदान उपलब्ध करून दिले.वसतिगृह ही केवळ निवासाची व्यवस्था नव्हती. तेथे निवास, भोजन, अभ्यासासाठी जागा, शिष्यवृत्ती, ग्रंथालय, शिस्तबद्ध वातावरण आणि सामाजिक जाणीव यांची सांगड घालण्यात आली होती. ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना शहरातील शिक्षणाशी जुळवून घेण्यासाठी हे केंद्र महत्त्वाचे ठरले. आजही हे वसतीगृह सुरू असून या ठिकाणी माजी विद्यार्थ्यांकडून सुंदर इमारत उभारली आहे.

मुस्लिम विद्यार्थ्यांसाठीही त्यांनी याच काळात वसतीगृह उभारले. हे वसतिगृह आजही सुरू असून सर्व समाजातील विद्यार्थी या ठिकाणी प्रवेश घेतात. शाहू महाराजांनी ठरवून दिल्याप्रमाणे मुस्लिम ट्रस्टद्वारे हे वसतिगृह आजही कार्यरत असून विविध मान्यवरांनी भेटी दिल्या आहेत. महाराष्ट्रात अशा पद्धतीच्या वसतिगृहांची रचना कुठेच दिसून येत नाही.विशेष म्हणजे शंभर वर्षानंतरही हे वसतिगृह अजूनही विद्यार्थ्यांना अल्पदरामध्ये राहण्याची, जेवणाची, निवाऱ्याची, व्यवस्था करून देते.अनेक पिढ्यांना घडविण्याचे काम या दगडी कोरीव इमारतीतून झाले असून कोल्हापूरचा फेरफटका मारल्यानंतर या वास्तू आजही लक्ष वेधून घेतात.शाहू महाराजांनी शिक्षण आणि रोजगार यांचा परस्परसंबंध ओळखला होता. शिक्षण घेतलेल्या मागासवर्गीय युवकांना नोकरीची संधी मिळाली नाही तर त्यांचा शिक्षणावरील विश्वास कमी होईल, हे त्यांनी ओळखले. त्यामुळे २६ जुलै १९०२ रोजी त्यांनी संस्थानातील सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर केले. भारतातील आरक्षणाच्या इतिहासातील हा एक मैलाचा दगड मानला जातो. शिक्षण, वसतिगृहे आणि आरक्षण या त्रिसूत्रीमुळे बहुजन समाजात नवे नेतृत्व निर्माण झाले.शाहू महाराजांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. १९१७ मध्ये त्यांनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला. सात ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना शाळेत पाठविणे पालकांसाठी बंधनकारक करण्यात आले. मुलांना शाळेत न पाठविणाऱ्या पालकांवर दंड आकारण्याची तरतूदही करण्यात आली होती. काही नोंदींनुसार विलंब करणाऱ्या पालकांकडून दरमहा एक रुपया दंड आकारला जात असे.स्वतःच्या दरबार खजिन्यातून आणि देवस्थान फंडातून पैसे वळते करून शिक्षणाला महत्त्व देणारा हा राजा म्हणूनच सामाजिक क्रांतीचा जनक मानला जातो. या योजनेसाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून शाहू महाराजांनी विशेष शिक्षण कर लागू केला. डॉक्टर, वकील, सावकार, अधिकारी आणि विशिष्ट उत्पन्न गटातील घटकांकडून शिक्षण उपकर आकारण्यात येत असे. शिक्षणासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्याचा हा दूरदृष्टीचा निर्णय होता.

शाहू महाराजांच्या कार्यकाळात कोल्हापूरला शिक्षणाची काशी म्हणून ओळख मिळाली. १९१७ मध्ये संस्थानात केवळ २७ शाळा आणि सुमारे १,३०० विद्यार्थी होते. मात्र १९२२ मध्ये त्यांच्या निधनाच्या वेळी शाळांची संख्या ४२० पर्यंत आणि विद्यार्थ्यांची संख्या २२ हजारांहून अधिक झाली होती. शिक्षणाचा हा विस्तार अभूतपूर्व मानला जातो.शाहू महाराजांनी कोल्हापूरला मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस असे संबोधले होते.महाराष्ट्रभर उभारल्या गेलेल्या वसतिगृहांच्या चळवळीमागे त्यांचीच प्रेरणा होती. त्यांनी उभारलेल्या या वसतीगृहाचा लाभ, या वसतिगृहांमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व करणाऱ्या विविध क्षेत्रात नाव कमावणाऱ्या अनेकांनी घेतला आहे.आज महाराष्ट्र शासन समाजकल्याण, इतर मागास बहुजन कल्याण, आदिवासी विकास, सामाजिक न्याय, भटक्या-विमुक्त कल्याण तसेच मराठा समाजासाठी उभारण्यात येणाऱ्या विविध वसतिगृहांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निवास, भोजन, शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देत आहे. या सर्व योजनांच्या पायाशी शाहू महाराजांनी मांडलेली शिक्षण सर्वांसाठी हीच मूलभूत संकल्पना असल्याचे स्पष्ट दिसते. वसतिगृह केवळ विद्यार्थी घडवत नाही तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देते राज्य शासनाने वसतिगृहाचे महत्त्व लक्षात घेऊन विविध खात्यामार्फत हजारो वसतिगृहांची, आश्रमशाळांची उभारणी केली आहे.या सुविधांमधून तयार झालेली एक पिढी राज्याचे विविध क्षेत्रात नेतृत्व करत आहेत.राजर्षी शाहू महाराजांचे संपूर्ण कार्य पाहिले तर त्यांनी शिक्षणाला केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन मानले नाही, तर सामाजिक न्याय, समता आणि स्वाभिमानाचे माध्यम मानले. ब्रिटिश भारतामध्ये अन्य राज्यांमध्ये शिक्षणावर जितका खर्च होत नव्हता तितका खर्च कोल्हापूर सारख्या एका छोट्या संस्थांमध्ये महाराजांच्या दूरदृष्टीमुळे व शैक्षणिक महत्त्व त्यांना पटल्यामुळे होत होता. शैक्षणिक आघाड्यांवर महाराष्ट्रामध्ये पुढे मोठ मोठ्या संस्था उभ्या झाल्या, विद्यापीठे उघडल्या गेली, या सर्वांची प्रेरणा छत्रपती शाहू महाराज होते.

शाहू महाराजांनी उभी केलेली ही वसतिगृहे आजही ताठ मानेने सुरु आहेत.आता जातीची बंधणे राहिली नाही.सर्व वसतिगृहात सर्व जाती-पातीची मुले शिक्षण घेत आहेत. मात्र गरजू, गरीब आणि प्रज्ञावान मुलांसाठी आजही ही वसतिगृहे सामाजिक, आर्थिक परिवर्तनाची व मानसिक बलस्थानाची केंद्रे आहेत. वसतिगृह चळवळीच्या माध्यमातून त्यांनी शिक्षणाची दारे बहुजन समाजासाठी खुली केली.शिक्षण,आरक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृहे आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण या उपाययोजनांद्वारे त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा एक नवा अध्याय लिहिला. म्हणूनच शाहू महाराजांना शिक्षणातून समाज परिवर्तन घडविणारे युगपुरुष म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. त्यांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. समाजाच्या प्रगतीचा खरा मार्ग शिक्षणातूनच जातो.

# ‘हा दोष नेमका कोणाचा?’




‘हा दोष नेमका कोणाचा?’ हा प्रश्न आज महाराष्ट्राच्या राजकारणात केवळ विचारला जात नाही, तर तो प्रत्येक सुजाण मतदाराच्या मनात संतापाची ठिणगी पेटवत आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातून बाहेर पडलेल्या खासदारांनी आणि आमदारांनी बंडाचे निशाण फडकवताना एकच तुणतुणे वाजवले. ‘‘आमच्या मतदारसंघात विकासासाठी निधी मिळत नव्हता!’’ वरवर पाहता हा युक्तिवाद कितीही गोंडस वाटत असला, तरी समाज माध्यमांवर जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीने या फुटीरबहाद्दरांचा बुरखा टराटरा फाडला आहे. आकडेवारी सांगते की, जवळपास सर्वच लोकप्रतिनिधींना सन्मानजनक निधी मिळाला होता. मग गोम कुठे आहे? गोम ही आहे की, निधी मिळूनही खर्च मात्र या महाभागांनी सर्वात कमी केला!

हा सरळ सरळ जनतेच्या पैशांचा आणि विश्वासाचा द्रोह आहे. जर निधी मिळाला होता आणि तो खर्च झाला नाही, तर तुमच्या मतदारसंघात विकास कसा होणार? आणि जर तुम्ही स्वतःच निधी खर्च करू शकला नाही, तर मग ‘‘निधी मिळत नव्हता’’ हा रडण्याचा आव कशासाठी? स्वतःचे अपयश लपवण्यासाठी आणि सत्तेच्या उबदार कुशीत शिरण्यासाठी ‘निधी’ हे केवळ एक सोयीस्कर कारण बनवले गेले, हे आता सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ झाले आहे.

**...पण खरोखरच निधी मिळत नसेल,तर दोष नेमका कोणाचा?**-या राजकीय नाट्यात जर आपण क्षणभर असे गृहीत धरले की, विरोधी पक्षाच्या आमदारांना खरोखरच निधी मिळत नव्हता; तर या भीषण परिस्थितीचे विश्लेषण करताना आपल्याला एकाच वेळी सत्ताधारी, स्वतः विरोधी पक्ष आणि आपल्या सडलेल्या राजकीय व्यवस्थेचे वाभाडे काढावे लागतील.

**सत्ताधाऱ्यांची आकसबुद्धी आणि घटनात्मक द्रोहः** भारतीय राज्यघटनेनुसार, निवडून आलेला प्रत्येक मंत्री आणि मुख्यमंत्री ‘कोणताही भेदभाव न करण्याची’ शपथ घेतो. जर केवळ विरोधी पक्षाचा आमदार आहे म्हणून एखाद्या मतदारसंघाचा निधी रोखला जात असेल, तर हा सरळ सरळ घटनात्मक द्रोह आहे. विरोधी आमदाराला डावलणे म्हणजे त्या आमदाराला नाही, तर त्या मतदारसंघातील लाखो करदात्या जनतेला शिक्षेच्या खाईत लोटण्यासारखे आहे. केवळ राजकीय सूड उगवण्यासाठी आणि विरोधकांना नामोहरम करण्यासाठी सत्तेचा आणि सरकारी तिजोरीचा वापर करणे, हा लोकशाहीचा उघड खून आहे आणि याचा पहिला व मुख्य दोष सत्ताधाऱ्यांचाच आहे.

**विरोधी आमदारांची निष्क्रियता आणि लढण्याची मानसिकता नसणेः** परंतु, नाण्याची दुसरी बाजू याहून गंभीर आहे. जर खरोखरच निधी मिळत नव्हता, तर हे विरोधी पक्षातले लोकप्रतिनिधी नेमके काय करत होते? ते गाढ झोपले होते का? जनतेने तुम्हाला केवळ एसी गाड्यांमधून फिरण्यासाठी किंवा मंत्र्यांच्या दालनाबाहेर लाचार उभे राहण्यासाठी निवडून दिलेले नसते. निधी मिळत नसेल तर रस्त्यावर उतरून आंदोलन करणे, सभागृहात सरकारला धारेवर धरणे आणि न्यायालयात जाऊन हक्काचा निधी खेचून आणणे, हे विरोधी आमदारांचे आद्य कर्तव्य आहे. पण हा संघर्ष करण्याचे कष्ट न घेता, थेट सत्तेच्या कुशीत जाऊन बसणे ही लाचार प्रवृत्ती आहे. जनतेने तुम्हाला लढण्यासाठी पाठवले होते, शरणागती पत्करण्यासाठी नाही! ‘‘निधी मिळत नव्हता म्हणून पळालो,’’ असे सांगणे म्हणजे स्वतःची अकार्यक्षमता जाहीरपणे मान्य करण्यासारखे आहे.

**प्रदीप नागापूरकर**

**प्रशासनाचे राजकीयकरण आणि व्यवस्थागत दोषः** या परिस्थितीत तिसरा दोष नोकरशाहीचा आणि आपल्या सदोष व्यवस्थेचा आहे. आज प्रशासनातील सनदी अधिकारी सत्ताधाऱ्यांच्या एवढ्या दबावाखाली काम करत आहेत की, विरोधी आमदारांच्या फायली जाणीवपूर्वक लालफितीत अडकवून ठेवल्या जातात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आपल्या व्यवस्थेत निधी वाटपाचे अमर्याद अधिकार मुख्यमंत्र्यांच्या किंवा विशिष्ट मंत्रालयाच्या हातात एकवटलेले आहेत. निधीचे वाटप हे लोकसंख्येच्या किंवा गरजेच्या आधारावर कायदेशीररित्या बंधनकारक असायला हवे, जेणेकरून कोणत्याही मुख्यमंत्र्याला आपल्या मर्जीनुसार निधीची खिरापत वाटता येणार नाही. अशी कोणतीही ठोस कायदेशीर तरतूद नसणे, हा या व्यवस्थेचा मोठा दोष आहे.

**पक्षांतर बंदी कायदा आणि मतदारांशी बेईमानी**-राजकीय विचारसरणी बदलण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, हे मान्य. पण लोकशाहीत त्याला काही नीतिमत्ता आणि नियम आहेत. भारतीय राज्यघटनेतील पक्षांतर बंदी कायद्यानुसार, जर तुम्हाला पक्ष बदलायचा असेल, तर आधी आपल्या पदाचा राजीनामा द्यायला हवा. हिंमत असेल तर पुन्हा मतदारांसमोर जाऊन नशीब अजमावायला हवे.विरोधी पक्षाच्या तिकिटावर, त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या रक्ताचे पाणी करून घेतलेल्या कष्टावर आणि मतदारांच्या विश्वासावर निवडून यायचे; आणि नंतर ‘‘निधी मिळत नाही’’ किंवा ‘‘विकास करायचा आहे’’ अशी पोकळ कारणे देऊन सत्तेच्या गोटात सामील व्हायचे, ही सरळ सरळ मतदारांशी केलेली बेईमानी आहे. हा मतदारांच्या मतांचा क्रूर अपमान आहे.

**विकासाचे दावे आणि वास्तव**-आज देशातील आणि अनेक राज्यांमधील सत्ताधाऱ्यांच्या विकासाच्या दाव्यांची गम्मत पाहा. उत्तर प्रदेशात सत्ता आल्यावर तिथे ‘कॅलिफोर्निया’ झाला की अजून कोणता चमत्कार झाला, हा खरोखरच संशोधनाचा विषय आहे. आणि विशेषतः ज्या खासदारांनी निधीचे कारण पुढे करून पक्षांतर केले, त्यांनी यावर नक्कीच संशोधन केले पाहिजे.

गुजरातचे उदाहरण तर डोळे उघडणारे आहे. गेल्या तीन-चार दशकांपासून तिथे एकाच पक्षाची सत्ता आहे. ‘गुजरात मॉडेल’ चे ढोल देशभरात एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाजवले गेले की जणू काही तिथे स्वर्गाचेच अवतरण झाले आहे. मग प्रश्न असा पडतो की, जर तिथे एवढा प्रचंड विकास झाला असेल, तर गुजरात मधील गरीब, कामगार आणि सुशिक्षित तरुण रोजगारासाठी आणि चांगल्या आयुष्यासाठी इतर राज्यांमध्ये का स्थलांतरित होत आहेत? विकासाची गंगा जर तिथे वाहत आहे, तर लोक ती सोडून बाहेर का पडत आहेत? या प्रश्नाचे उत्तर या फुटीर खासदारांकडे आहे का?

**आत्मपरीक्षणाची वेळ**-शेवटी, हा दोष नेमका कोणाचा? हा दोष त्या नेत्यांचा आहे ज्यांनी वैयक्तिक स्वार्थासाठी तत्त्वे गुंडाळून ठेवली. हा दोष त्या सत्तेचा आहे जी आकसबुद्धीने वागते. हा दोष त्या विरोधी लोकप्रतिनिधींचा आहे जे लढण्याऐवजी लाचारी पत्करतात आणि काही अंशी, हा दोष आपलाही आहे की आपण अशा नेत्यांना निवडणुकीत पुन्हा जाब विचारत नाही.आता वेळ आली आहे की मतदारांनी आक्रमक झाले पाहिजे. ‘‘निधी मिळाला नाही’’ म्हणून पळ काढणाऱ्या नेत्यांना त्यांची विकासकामांची आकडेवारी समोर ठेवून जाब विचारला पाहिजे. लोकशाही ही काही नेत्यांच्या फायद्यासाठी खेळायचा खेळ नाही. हा लेख केवळ एका पक्षातून बाहेर पडलेल्यांवर टीका करणारा नाही, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेला आरसा दाखवणारा आणि मतदारांना आत्मपरीक्षण करायला लावणारा एक आक्रमक इशारा आहे! जर आज आपण गप्प राहिलो, तर उद्या कोणताही नेता उठेल आणि आपल्या मतांची उघड बाजारात विक्री करेल.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# हदगावचे माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर आपले 'मौन' कधी सोडणार?

## राजकीय भूमिकेबाबत कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम..!

**शेख चांदपाशा**



हदगाव-नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात सध्या हदगाव विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे माजी आ. माधवराव पा.जवळगावकर यांच्या पुढील राजकीय भूमिकेची जोरदार चर्चा रंगली आहे. लवकरच ते भाजपात प्रवेश करणार असल्याची चर्चा त्यांच्या समर्थकांमध्ये होत असून जवळगावकरांनी मात्र संभाव्य पक्ष प्रवेशा विषयी सध्या तरी मौन बाळगले आहे.

माजी आ.जवळगावकर हे खा.अशोक चव्हाण यांचे समर्थक म्हणून ओळखले जातात. खा.अशोक चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतरही जवळगावकरांनी काँग्रेसची साथ सोडली नाही. आता मात्र अशोक चव्हाण यांच्याशी जवळकीता वाढू लागली असून तसेच काँग्रेसच्या कार्यक्रमांना जवळगावकर हे गैरहजर राहत आहेत. हिमायतनगर येथे त्यांनी आपल्या समर्थकांची व कार्यकर्त्यांची बैठक घेवून त्यांची मते जाणवुन घेतली आहेत. काँग्रेस पक्षात त्यांचे मन रमत नसल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये सुरु आहे.

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या भाजप प्रवेशानंतर नांदेड शहरासह जिल्ह्यातील अनेक काँग्रेस पदाधिकारी, माजी नगरसेवक आणि काही माजी जिल्हा परिषद सदस्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या पार्श्वभूमीवर माजी आ. जवळगावकर यांच्याकडूनही लवकरच मोठा निर्णय होईल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून मतदारसंघातील कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊनच पुढील निर्णय घेऊ, असं बैठका घेऊन ते सांगत आहेत. त्यानंतर काही बैठका झाल्याची चर्चा असली, तरी अंतिम निर्णयाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांनी भेट घेतल्याचीही राजकीय वर्तुळात चर्चा आहे. त्यामुळे त्यांच्या संभाव्य पक्षांतराच्या चर्चांना आणखी उधाण आले आहे. मात्र, या संदर्भात त्यांनी किंवा त्यांच्या निकटवर्तीयांनी अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही.

हदगाव मतदारसंघातील काही कार्यकर्त्यांनी म्हटले आहे की माजी आ.जवळगावकर हे लवकरच नवा राजकीय निर्णय जाहीर करतील. काँग्रेसमधील अनेक निष्ठावंत कार्यकर्ते त्यांच्या भूमिकेची प्रतीक्षा करत आहेत. जिल्हा काँग्रेसमधील वरिष्ठ नेतेही या विषयावर त्यांच्या भाष्य करण्याचे टाळत असल्याचे दिसून येत आहे. राजकीय चर्चांमध्ये आणखी एक मुद्दा सातत्याने पुढे येत आहे. तत्कालीन महायुतीच्या सरकारमध्ये विरोधी पक्षाचे आमदार असतानाही माजी आ. जवळगावकर यांनी महायुती सरकारच्या काळात मतदारसंघात विविध विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून घेतला होता. त्यामुळे त्यांचे सत्ताधारी नेत्यांशी चांगले संबंध असल्याची चर्चा यापूर्वीपासूनच होती. याच पार्श्वभूमीवर त्यांच्या संभाव्य पक्षांतराबाबत तर्क-वितर्कांना अधिक बळ मिळत आहे. सध्या हदगाव विधानसभा मतदारसंघात एकच प्रश्न चर्चिला जात आहे. माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर आपले राजकीय मौन कधी सोडणार आणि पुढील वाटचालीबाबत स्पष्ट भूमिका कधी जाहीर करणार.

हदगाव विधानसभा क्षेत्राचे माजी आ.माधवराव पाटील जळगावकर यांनी काँग्रेस विषयी आपली भूमिका लवकर का स्पष्ट का करत नाहीत. जेणेकरून सर्वसामान्य काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नेमकँ काय करावं हे समजत नाही, कारण की हदगाव विधानसभा क्षेत्राला काँग्रेस नेतृत्वच नाही अशी धरणा काँग्रेस कार्यकर्त्यांची झालेली आहे. आपल्या निकटच्या कार्यकर्त्यांना काँग्रेसचे विविध पदे असल्यामुळे ते पण सक्रिय दिसत नाहीत, यासंदर्भात अनेक काँग्रेसच्या निष्ठावान कार्यकर्त्यांनी प्रस्तुत प्रतिनिधी जवळ आपल्या तिव्र भावना व्यक्त केल्या आहेत.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात २६ जून सकाळी ६ वाजेपासून ते १० जुलैच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २६ जून रोजी सकाळी ६ वाजेपासून ते १० जुलै रोजीच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

# महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांनी नियमबाह्यरित्या कर्मचाऱ्यांच्या केल्या अन्यायकारक बदल्या

## चौकशीच्या मागणीसाठी माविकसंतर्फे १३ जुलैपासून उपोषण

नांदेड/प्रतिनिधी-महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री.खंदारे यांनी नियमबाह्य व मनमानी पद्धतीने कर्मचाऱ्यांच्या अन्यायकारक बदल्या केल्या आहेत. सदरील बदली प्रकरणाची तात्काळ चौकशी करुन कार्यवाही करावी अन्यथा दि.१३ जुलै पासून नवामोंढा येथील विद्युत भवन समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे नांदेड सर्कल अध्यक्ष आर.डी. पवार व सचिव नितीन भालेराव यांनी निवेदनात नमूद केले आहे की, संजय खंदारे हे नांदेड येथे अधीक्षक अभियंता पदावर रुजू झाल्यानंतर काही दिवसातच मनमानी पद्धतीने कारभार सुरु केला आहे. महावितरणमधील कर्मचाऱ्यांच्या बदल्या मनमानी पद्धतीने व शासनाचे नियम धाब्यावर बसवून केल्या आहेत. अपंग कर्मचारी वैशाली विजय पाटील यांची नांदेड येथील टेस्टींग डिव्हीजनमध्ये नियुक्ती असतांना त्यांची नांदेड ग्रामीण विभागात अन्यायकारक बदली करण्यात आली आहे. वैशाली पाटील ह्या एका पायाने अपंग आहेत. अपंग कर्मचाऱ्या बाबत शासनाचे परिपत्रक असतांना नियम डावलून ही बदली करण्यात आली. तसेच चौफाळा येथे यंत्र चालक म्हणून कार्यरत असलेले अपंग कर्मचारी म.अखिल समद सुलेमानी यांची बदली शिराढोण येथील उपकेंद्रात करण्यात आली. या दोन्ही अपंग कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने अन्याय केला आहे. या दोन्ही कर्मचाऱ्यांची बदली रद्द करुन त्यांना सोईच्या ठिकाणी नियुक्ती द्यावी. तसेच संघटनेच्या इतर सभासदांवरही अधिक्षक अभियंता संजय खंदारे यांनी अन्याय केला आहे. काही कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय कारणास्तव विनंती बदलीसाठी अर्ज दिले असतांना त्यांच्या बदल्या केल्या नाहीत. या सर्व प्रकरणाची महावितरण प्रशासनाने चौकशी करुन अधिक्षक अभियंता संजय खंदारे यांच्यावर कारवाई करावी. तसेच दोन्ही अपंग कर्मचाऱ्यांना शासनाच्या नियमानुसार सोयीच्या ठिकाणी नियुक्ती द्यावी, या मागणीसाठी माविकसंतर्फे दि.१३ जुलै पासून आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे संघटनेचे अध्यक्ष आर.डी.पवार व सचिव नितीन भालेराव यांनी मुख्य अभियंता यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# निकृष्ट दर्जाच्या सुपारीचा ८६ लाखांचा साठा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-अन्न व औषध प्रशासनाने गुप्त माहितीच्या आधारे मोठी कारवाई करत नांदेड जिल्ह्यात निकृष्ट दर्जाची असल्याचा संशय असलेली सुपारी जप्त केली. या कारवाईत सुमारे २९ हजार ६७६ किलो सुपारीचा साठा जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजे किंमत ८६ लाख ३६ हजार रुपये इतकी आहे.

महाराष्ट्र राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार २२ जून २०२६ रोजी सोलापूर ते नागपूर महामार्गावरील पार्डी टोल नाका (ता. अर्धापूर, जि. नांदेड) येथे कारवाई करण्यात आली. के-२९ बी- ६८८० या वाहनाची तपासणी केली असता त्यामधील सुपारीचा दर्जा संशयास्पद वाटल्याने दोन अन्न नमुने प्रयोगशाळा विश्लेषणासाठी घेण्यात आले. उर्वरित संपूर्ण साठा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती शिल्पा श्रीरामे, श्रीमती अमृता दुधाटे, अरूण तम्मडवार आणि अ. नं. गिरी यांच्या पथकाने सहायक आयुक्त रा. मा. भरकड तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहआयुक्त (अन्न) श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली. दि.२५ जून २०२६ रोजी नांदेड येथील हॉटेल मिंट, छत्रपती चौक येथे बैठक आयोजित करण्यात आली.या बैठकीत सहायक आयुक्त रा.मा.भरकड आणि सु.द. जिंतुरकर यांनी संबंधित आस्थापनांना नियमांचे तंतोतंत पालन करण्याचे आवाहन केले.अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

# साकुर येथे अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त



माहूर/प्रतिनिधी-तालुक्यात सुरू असलेल्या अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने आक्रमक भूमिका आज दि.२५ रोजी कारवाई केली आहे. तालुक्यातील मौजे साकुर येथून अवैधरीत्या रेतीची वाहतूक करणारा ट्रॅक्टर महसूल पथकाने पकडून रेतीसह जप्त केला असून तो तहसील कार्यालय परिसरात जमा करण्यात आला आहे.

तहसीलदार अभिजित जगताप माहूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत मंडळ अधिकारी योगिता राठोड, ग्राम महसूल अधिकारी पवन यादव, एच. डी.गावंडे, सी.पी.बाबर तसेच कोतवाल चिरंगे आणि सागर हिवाळे यांनी सहभाग घेतला. विशेष म्हणजे, मंडळ अधिकारी योगिता राठोड आणि ग्राम महसूल अधिकारी पवन यादव यांनी धाडस दाखवत अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर रोखून धरला. कारवाईदरम्यान नदीपात्रात आणखी एक ट्रॅक्टर असल्याचे निदर्शनास आले. मात्र महसूल पथक पोहोचण्यापूर्वीच त्या ट्रॅक्टर चालकाने घटनास्थळावरून पळ काढण्यात यश मिळवले.या कारवाईमुळे अवैध रेती व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली असून महसूल विभागाच्या धडक कारवाईमुळे रेती माफियांचे धाबे दणाणले आहेत. तालुक्यातील अवैध उत्खनन आणि वाहतुकीवर प्रशासनाचा करडा वचक कायम राहणार असल्याचे संकेत या कारवाईतून मिळत आहेत.

# ॲड.श्रेयश गच्चे यांचे रविवारी व्याख्यान

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्रातील होऊ घातलेल्या अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाचे वकील ॲड. श्रेयश गच्चे यांचे व्याख्यान रविवार, दि. २८ जून रोजी येथील सहयोगनगरच्या बौद्ध विहारात सकाळी साडेनऊ वाजता महाविहार परिवाराच्या वतीने आयोजित केले आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गाच्या शिक्षण व नोकरीविषयक आरक्षणात करावयाच्या उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर सध्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर जन आंदोलने होत आहेत. महाविहार परिवाराच्या वतीने सदर विषयावर प्रसिद्ध विधीज्ञ तथा सर्वोच्च न्यायालयातील वकील ॲड. श्रेयस यशवंतराव गच्चे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.तरी सदर व्याख्यानास अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व बौद्ध समाजातील जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाविहार परिवाराच्या वतीने डॉ. भीमराव हाटकर, हिरामण वाघमारे, रमेश दुधमल, साहेबराव पुंडगे, शुध्दोधन जोंधळे, इंजिनीयर डी.डी. भालेराव आदी कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

नांदेड/प्रतिनिधी-शेतातील नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून एका शेतकऱ्याने विहिरीमध्ये उडी मारुन आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी सायंकाळी नायगाव तालुक्यातील मौजे टेंभूर्णी येथे घडली आहे. मौजे टेंभूर्णी येथील तरुण शेतकरी केदार नागनाथ वेनापल्ले (वय २६) रा.मौजे टेंभूर्णी या शेतकऱ्याने शेतीसाठी बँकेचे कर्ज घेतले होते. शेतातील नापिकीमुळे कर्जाची परतफेड करता आली नाही. कर्जाच्या परतफेडीच्या चिंतेतून व आर्थिक विवंचनेतून केदार वेनापल्ले यांनी शेतातील विहिरीत उडी मारुन आत्महत्या केली.


CHANGE IN NAME/SURNAME

My (old name) is **MALANBI NAYUMSAB SHAIKH** which now I am, changing as (new name) **SHAIKH MALANBI NAYUMSAB**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SHAIKH MALANBI NAYUMSAB**
R/o 65/2, Muslim Mohalla, Betmogra
Tq.Mukhed Nanded-431715
M.No.-8007740575

CHANGE IN NAME

My (old name) is **SHAMA PARVEEN ASLAM KHAN** which now I am, changing as (new name) **SHAMA PARVEEN KHURESHI MUJEEBUL HASAN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SHAMA PARVEEN KHURESHI MUJEEBUL HASAN**
R/o 1-17-178, Akhtar manzil behind
Pahnava redimed Kailash nagar
Nanded-431602
M.No.-9145126902


### महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर जि.नांदेड**

**ई-निविदा सुचना क्र.०४ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि.नांदेड (दुरध्वनी क्रमांक ०२४६७-२२२६५८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याकडून नांदेड जिल्ह्यातील एकूण ०५ कामांकरीता बी-१ नमुन्यातील ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे.

टीप- १) निविदा कागदपत्राचा तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/ आणि www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

२) सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.

३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि.नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी अभियंता**
सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर जि.नांदेड

डीजीआयपीआर/आरओसी-२०२६-२७/क्र. ५/सी१३१७

### जाहीर प्रगटन

नांदेड येथील सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष श्री.डी.एस.निंबाळकर साहेब ३ रे सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.८८७/२०२६

१) मोहम्मद ताहेर पि.मोहम्मद युसुफ वय : ३६ वर्ष व्यवसाय : व्यापार, २) मोहम्मद तय्याब पि.मोहम्मद युसुफ वय : ३६ वर्ष व्यवसाय : व्यापार, ३) शमशाद बेगम भ्र.मोहम्मद काजीम खान वय : ३३ वर्ष व्यवसाय : घरकाम रा.इकबालनगर नांदेड, ४) मोहम्मद तौफीख पि.मोहम्मद युसुफ वय : ३२ वर्ष व्यवसाय : व्यापार, ५) मोहम्मद तलेब पि.मोहम्मद युसुफ वय : २६ वर्ष व्यवसाय : व्यापार, ६) मैसेरा बेगम पि.मोहम्मद युसुफ वय : २४ वर्ष व्यवसाय : घरकाम वादी क्र.१, २, ४, ५, ६ सर्व रा.रहमतनगर देगलूर नाका,नांदेड

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत मोहम्मद युसुफ पि.अब्दुल खादर आणि शमीम सुलताना मोहम्मद युसुफ यांचे वारस आहेत. मयत मोहम्मद युसुफ पि.अब्दुल खादर आणि शमीम सुलताना मोहम्मद युसुफ यांचा मृत्यू दिनांक ११/११/२०१९, ०२/१२/२०१९ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत:ता न्यायालयात दिनांक ३०/०७/२०२६ रोजी किंवा एक महिन्यामध्ये नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २४/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| क. लिपिक | स्वाक्षरित/- |
| ३ रे सह दिवाणी न्यायालय | स.अधिक्षक |
| क.स्तर नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

### जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज ७४७/२०२६
संघमित्रा व ईतर वि. निरंक
ने. ता. १७/०७/२०२६

अर्जदार:- १. संघमित्रा भ्र.संजय भद्रे, (संघमित्रा पि.विठ्ठल वाघमारे) वय ४४ वर्षे, व्यवसाय घरकाम, रा.ईकळीमोर, ता.नायगाव जि.नांदेड, २. धम्मानंद पि.विठ्ठल वाघमारे, वय ४५ वर्षे, व्यवसाय मजुरी, ३. भिमानंद पि.विठ्ठलराव वाघमारे, वय ४३ वर्षे, व्यवसाय मजुरी, अर्जदार क्र.२ व ३ रा.ज्ञानेश्वरनगर, हडको, सिडको, ता.जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत विठ्ठल पि.गणपत वाघमारे यांचा मृत्यु दिनांक ०६/०४/२०२३ रोजी ज्ञानेश्वरनगर, हडको/सिडको, नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्र.१ ही मयताची मुलगी असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. सदरच्या अर्जात अर्जदार यांनी अर्जदार हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक १७/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फेयोग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २५/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| क. लिपिक | स्वाक्षरित/- |
| सह दिवाणी न्यायालय, | सहा.अधिक्षक |
| क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

जा.क्र.मनपा/क्षे.का.३/नावपरि/१६९/२६-२७
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : ०५/०६/२०२६

### जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.३२/क्षे.का.क्र.०३/४०/२०२६-२७**

**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्रीमती **सुप्रिया भ्र.गोविंद शिरुरकर, गोविंद पि.बापूराव शिरुरकर** रा.**बँक कॉलनी,**नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, सर्व्हे नं.**४/१, ४/३ पैकी सि.स.नं.- पैकी/गाव नमुना सात पैकी प्लॉट नं.११०** ज्याचा महानगरपालिका **मा.क्र.१-११-८७८ (पीन नं. ४०१०११००३०) शिवाजी व्यंकटराव भोसले** यांच्या नांवे असलेली मालमत्ता यांचेकडून अर्जदाराने **विक्रीखत नं.३०५२ दि.२४.०३.२०२१** आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्काने प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर अकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे.

तरी या संबंधात काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यात येईल.

**चर्तु:सिमा:- पुर्वेस**- ९.०० मीटर रुंदीचा रोड आहे, **पश्चिमेस-** साफल्य नगर आहे, **दक्षिणेस-** प्लॉट नं.१०९ कुलकर्णी यांचा आहे, **उत्तरेस-**प्लॉट नं.१११ आहे.

स्वाक्षरित/-
**सहा.आयुक्त**
क्षेत्रीय कार्यालय क्र.०३, शिवाजीनगर
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जा.क्र.मनपा/क्षे.का.३/नावपरि/१३९/२६-२७
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : २६/०५/२०२६

### जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.२४/क्षे.का.क्र.०३/४०/२०२६-२७**

**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, **मगृनिम/फुरखाना रुबी इलीयास अन्सारी** रा.**लेबर कॉलनी,** नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, **सर्व्हे नं.७४ पी पैकी सि.स.नं.६६४२ पैकी/**गाव नमुना सात **पैकी फ्लॅट नं.१७/११०** ज्याचा महानगरपालिका **मा.क्र.१-८-४५९ (पीन नं.४०१०१०६८९७) मगृनिम/शेख मदार शेख ईमाम** यांच्या नांवे असलेली मालमत्ता यांचेकडून **आबेदा बेगम अब्दुल रज्जाक** अर्जदाराने **ओनरशिप पध्दतीने विक्रीखत नं.१५०० दि.१६.०२.२०२६** आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्काने प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर अकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे.

तरी या संबंधात काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यात येईल.

**चर्तु:सिमा:- पुर्वेस**- मनपा सी.सी.रोड आहे, **पश्चिमेस-** गाळा क्र.१७/९१ आहे, **दक्षिणेस-** गाळा क्र.१७/१११ आहे, **उत्तरेस-**गाळा क्र.१७/१०९ आहे.

स्वाक्षरित/-
**सहा.आयुक्त**
क्षेत्रीय कार्यालय क्र.०३, शिवाजीनगर
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

# नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड



पूज्य स्वामी रामानंद तीर्थ
संस्थापक अध्यक्ष

## ७६ वा वर्धापन दिन

हिचे पुत्र आम्ही,
हिचे पांग फेडू
हिला बैसवू वैभवाचे शिरी !



पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ
माजी अध्यक्ष

---

### नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या
७६ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

बी.ए., बी.कॉम., एम.ए. व एम.कॉम. साठी
प्रवेश प्रक्रिया सुरु आहे ...!

महाविद्यालयात उपलब्ध शैक्षणिक सुविधा :

* NSS - राष्ट्रीय सेवा योजना
* NCC - राष्ट्रीय छात्र सेना
* सुसज्ज मुलींचे वसतीगृह
* मुलांचे वसतीगृह
* भव्य क्रिडांगण
* सांस्कृतिक विभाग- सूप्त गुणांना वाव
* स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
* नेट/सेट मार्गदर्शन केंद्र
* नरहर कुरुंदकर सभागृह
* समृध्द ग्रंथालय
* डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका
* भाषा प्रयोगशाळा
* संगणक प्रयोगशाळा
* संशोधन केंद्र
* स्मार्ट क्लासरुम



**डॉ. विकास सुकाळे**
प्राचार्य,
पीपल्स कॉलेज, नांदेड

---

### नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या
७६ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

B.Sc & M.Sc. (Botany, Mathematics, Zoology, Computer Science, Physics, Microbiology, Biotech, Chemistry, Statistics, Applied Math.)

प्रवेश प्रक्रिया सुरु आहे ...!

* नॅक, बैंगलोरद्वारे ४ थ्या फेरीच्या नॅक मूल्यांकनामध्ये उत्तुंग गरुडझेप घेत 'अ+' दर्जा (CGPA ३.३५) प्राप्त * DST-FIST Programme * NIRF Ranking -७२
* यु.जी.सी. कडून उत्कृष्टतेची क्षमता असलेले महाविद्यालय (CPE) म्हणून दर्जा प्राप्त
* स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार प्राप्त
* पदवीमध्ये १५ विषय व १२ विषयात पदव्युत्तर शिक्षणाची सोय
* सुंदर आणि निसर्गरम्य ४५ हेक्टर परिसरात असलेले महाविद्यालय
* कै. सदाशिवराव पाटील भव्य क्रीडा संकुल- राष्ट्रीय दर्जाचे ३ टेनिस कोर्ट, इनडोअर बॅडमिंटन कोर्ट, इनडोअर व आऊटडोअर व्हॉलीबॉल कोर्ट, भव्य क्रीडांगण, ४०० मिटर ऑलंपिक रनिंग ट्रॅक * १०० मुलि व १०० मुले राहण्याची सोय असलेले वसतीगृहे
* कनिष्ठ महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत
* सुसज्ज व समृध्द ग्रंथालयात एकूण ३६००० च्यावर ग्रंथ
* भूगर्भशास्त्र विभागात सिस्मिक सेंटर
* सर्व परिसर निसर्गरम्य व विविध दुर्मिळ वनस्पती, मेडीसनल प्लांट गार्डन, बॉटनिकल गार्डन, मत्स्यशास्त्राचा भव्य टैंक, अॅक्वेरियम, सोलार युनिट, व्हर्मीकल्चर, बायोगॅस प्लांट इत्यादी सूविधा आहेत.



**डॉ. लक्ष्मण शिंदे**
प्राचार्य,
सायन्स कॉलेज, नांदेड

---

### नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या
७६ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!



**श्री. प्रशांत चौधरी**
मुख्याध्यापक,
पीपल्स हायस्कुल, नांदेड

---

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या
७६ व्या वर्धापन दिनानिमित्त
उज्ज्वल भवितव्यासाठी
हार्दिक शुभेच्छा

**प्रा. एकनाथ खिल्लारे**
उपप्राचार्य,
सायन्स कॉलेज (कनिष्ठ), नांदेड
कार्यकारिणी सदस्य,
नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड



---

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या
७६ व्या
वर्धापन दिनानिमित्त
उज्ज्वल भवितव्यासाठी
हार्दिक शुभेच्छा!



डॉ.सौ.अरुणा राजेंद्र शुक्ल
उपप्राचार्य,
सायन्स कॉलेज, नांदेड

---

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या
७६ व्या
वर्धापन दिनानिमित्त
उज्ज्वल भवितव्यासाठी
हार्दिक शुभेच्छा!



डॉ. विशाल रावसाहेब पतंगे
उपप्राचार्य,
पीपल्स कॉलेज, नांदेड

---

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या
७६ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !



**श्री.राहुल गोरे**
सहशिक्षक, पीपल्स हायस्कूल, नांदेड
कार्यकारिणी सदस्य,
नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड

---

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!

**पीपल्स कॉलेज स्टाफ को. ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. नांदेड**
नोंदणी क्र. एन.एन.डी./बी.एन.के. १२२/७६ दि.२५.५.१९७६
बिना सहकार नाही उद्धार



**प्रा.डॉ.बालाजी पोतुलवार**
अध्यक्ष, पीपल्स कॉलेज स्टा.को.ऑप. क्रेडीट सोसा.लि.



**प्रा.विलास वडजे**
उपाध्यक्ष,पीपल्स कॉलेज स्टा.को.ऑप. क्रेडीट सोसा.लि.



**श्री.सय्यद इरफान**
सचिव,पीपल्स कॉलेज स्टा.को.ऑप. क्रेडीट सोसा.लि.

**संचालक मंडळ :** डॉ. सचिन पवार, डॉ. रेश्मा डोईफोडे, डॉ. राजेश सोनकांबळे, डॉ. मुकुंद कवडे, प्रा. संदिप गायकवाड, डॉ. माया भालेराव, सुर्यकांत राऊत

---

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त
उज्ज्वल भवितव्यासाठी हार्दिक शुभेच्छा

**एन.ई.एस. सायन्स कॉलेज एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि. नांदेड**
रजि. न.एन.डी./बि.एन.के. ११९/१९७५
बिना सहकार नाही उध्दार



**प्रा.डॉ.डी.आर. मुंडे**
**अध्यक्ष**, एन.ई.एस. सायन्स कालेज एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सो.लि.नांदेड



**प्रा.डॉ.एस.व्ही. वनवे**
**चिटणिस**, एन.ई.एस. सायन्स कालेज एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सो.लि.नांदेड



**श्री.एम.बी. सारंगे**
**उपाध्यक्ष**, एन.ई.एस. सायन्स कालेज एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सो.लि.नांदेड

**संचालक मंडळ :** सौ.ए. जी. मुगळीकर (कोषाध्यक्ष), प्रा. डॉ. डी.एम. जाधव, प्रा. सौ. व्ही. व्ही. कुलकर्णी, प्रा.एच.ए. धिरबसी, प्रा.एस.एफ. गोरे, प्रा.एन.एस. अंबरखाने, श्री. आर. बी. देशमुख

---

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या
७६ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !



**डॉ. सी.के. हरणावळे**
विभागप्रमुख व प्रोफेसर
वाणिज्य विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड

---

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या
७६ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !



**डॉ. बाजीराव वडवळे**
प्रमुख, पदव्युत्तर लोकप्रशासन
विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड

---

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या
७६ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!



**प्रा.डॉ. राजेश सोनकांबळे**
सहशिक्षक,
पीपल्स कॉलेज, नांदेड

---

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या
७६ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

**प्रा.विजयानंद कदम**
सहशिक्षक,
पीपल्स कॉलेज, नांदेड



---

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या
७६ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !




**श्री.रोहिदास आडे**
कार्यालयीन अधिक्षक,
सदस्य, महाविद्यालय विकास समिती
पीपल्स कॉलेज, नांदेड



**श्री.राहुल गवारे**
वरिष्ठ लिपीक,
पीपल्स कॉलेज, नांदेड

---



**सीए. (डॉ.) प्रविण पाटील**
(अध्यक्ष)



**अॅड. प्रफुल्ल अग्रवाल**
(उपाध्यक्ष)



**प्रा.सौ. श्यामल पत्की (कुरुंदकर)**
(सचिव)



**अॅड. प्रदिप नागापूरकर**
(सहसचिव)

कार्यकारिणी सदस्य : डॉ. व्यंकटेश काब्दे, श्री. नौनिहालसिंग जहागिरदार, अॅड. चिरंजीलाल दागडिया, डॉ. उमेश भालेराव, कु. शांभवी साले, डॉ. यशपाल भिंगे, श्री. व्ही.एन. वडजे, डॉ. ए.टी. शिंदे, श्री. ई.एम. खिल्लारे, श्री. राहुल गोरे, प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, निमंत्रित सदस्य प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, मुख्याध्यापक श्री. प्रशांत चौधरी

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४